PRESS RELEASE

**PRESS RELATIONS DIVISION**, Central Office, Post Box 406, Mumbai 400001
Phone: 2266 0502 Fax: 2266 0358, 2270 3279

**RESERVE BANK OF INDIA**

www.rbi.org.in
www.rbi.org.in\hindi
e-mail: helpprd@rbi.org.in

ऑगस्ट १६, २००४

## आता बँक ग्राहकांसाठी आरजीटीएस सेवा : भारतीय रिझर्व्ह बँक

भारतीय रिझर्व्ह बँकेने आज जाहीर केले आहे की ग्राहकांचे व्यवहार, कार्यान्वित करण्यासाठी तिची, 'रिअल टाईम ग्रॉस सेटलमेंट (आरजीटीएस)' प्रणाली सहभागी बँकांमध्ये 'स्ट्रेट थ्रू प्रोसेसिंग' साठी कार्यान्वित करण्यात आली आहे.

जमापत्र मिळाल्यावर ग्राहकांच्या व्यवहारांच्या 'स्ट्रेट थ्रू प्रोसेसिंग' मुळे बँकांना कोणत्याही मानवी हस्तक्षेपाविना ग्राहकाच्या खात्यावर थेट जमा करणे शक्य होणार आहे. शेअर बाजारांच्या बाबतीत या मुळे टी +१ ची पूर्तता करण्याची सोय शक्य होणार आहे. आरजीटीएस प्रणाली मधील ७२ सहभागी बँकांपैकी ३२ बँका, देशभरातील १३४ प्रमुख केंद्रांमधील ८४० शाखांमार्फत ग्राहक संबंधी आरजीटीएस फंड्स-ट्रान्स्फर सेवा देऊ करतात, ज्या मध्ये देशातील बँक व्यवसाया पैकी मोठा भाग मोडतो.

रिझर्व्ह बँकेने असेही म्हटले आहे, की प्राप्तकर्त्या बँकेच्या 'पेमेंट सिस्टिम्स गेटवे' वर, जमा सूचनापत्र मिळाल्यापासून, दोन तासांच्या आत, हिताधिकारी ग्राहकाच्या खात्यावर जमा करणे प्राप्तकर्त्या बँकेवर बंधनकारक आहे. ज्या बँक शाखा त्यांच्या ग्राहकांना आरजीटीएस सेवा देऊ करतात, अशा शाखांची यादी रिझर्व्ह बँकेच्या संकेत स्थळावर (www.rbi.org.in) आरजीटीएस लिंकखाली बँक ग्राहकांनी लाभ घ्यावा म्हणून उपलब्ध करण्यात आली आहे.

भारतीय रिझर्व्ह बँकेची 'रिअल टाईम ग्रॉस सेटलमेंट (आरजीटीएस)' सेवा मार्च २६, २००४ रोजी प्रथम कार्यान्वित झाली, हे आपणास आठवत असेलच. सुरुवातीला ती बँकांदरम्यानच्या व्यवहारांच्या पूर्ततेसाठी खुली होती. एप्रिल २९, २००४ पासून ही आरजीटीएस ही 'सिस्टिमिकली इंपॉर्टंट पेमेंट सिस्टिम' असून त्या मध्ये देशातील बँकिंग व वित्त अंतर्भूत आहे. ती निधी हस्तांतरणाची एक सुरक्षित इलेक्ट्रॉनिक प्रणाली असून देशभर कोणत्याही रकमेची रिअल-टाईम ऑन-लाईन सुविधा आंतर-बँक व्यवहारांच्या व ग्राहकाधारित आंतर-बँक व्यवहारांच्या पूर्ततेसाठी पुरविते. देशातील सर्व शेड्यूल बँका आरजीटीएस मध्ये सहभागी होऊ शकतात व त्यांच्या ग्राहकांना ही इलेक्ट्रॉनिक निधी हस्तांतरणाची सुविधा पुरवू शकतात. सध्या ७२ बँका आरजीटीएस च्या आंतर-बँक पूर्तता प्रणाली मध्ये सहभागी असून त्यामध्ये मुंबईतील एकूण आंतर-बँक व्यवहारांच्या पूर्ततेच्या मूल्यापैकी ९० टक्क्यांपेक्षा जास्त मूल्य समाविष्ट आहे.

**अल्पना किल्लावाला**
मुख्य महाव्यस्थापक

**प्रेस रिलीज : २००४-२००५ / १८८**